# लोकशाहीतील सत्तेचे विकेंद्रीकरण व सहकार

सर्व स्तरावर लोकांनी लोकांसाठी अस्तित्वात आणलेली प्रणाली – व्यवस्था म्हणजेच लोकशाही. राजकारण – समाजकारण या दोन्ही ठिकाणी अनेक व्यक्तींचा सहभाग म्हणजेच विकेंद्रीकरण. अर्थकारणामध्ये सुध्दा अनेकांचा सहभाग म्हणजेच विकेंद्रीकरण. वरील सर्व गोष्टी कृषिप्रधान भारत देशामध्ये आता कायद्याद्वारे, कागदावर व भाषणापुरत्या मर्यादित राहिलेल्या आहेत. महाराष्ट्र राज्यापुरते बोलायचे झाले तर राजकारण – समाजकारण व अर्थकारण याचे संपन्न लोकशाहीमध्ये विकेंद्रीकरण होण्याच्या ऐवजी केंद्रीकरणच झालेले आपणास प्रत्येक ठिकाणी आढळून येईल. समाजकारणातील दुसरे अंग म्हणजेच सहकार. अनेक व्यक्तींनी एकत्र येऊन महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ नुसार स्थापन केलेली एखादी संस्था म्हणजेच सहकार. आणि या सहकारी चळवळीत राज्य सहकारी बँक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, नागरी सहकारी बँका व पतसंस्था हे रक्कमांची थेट देवाण – घेवाण करणाऱ्या सहकारी संस्था आहेत. आणि यामध्ये देखील खऱ्या अर्थाने विकेंद्रीकरण झालेच नाही. महिला सहकारी संस्था, बेरोजगारांच्या सहकारी संस्था यांना देखील केंद्रीकरणापासून दूर करण्यास कोणालाच यश प्राप्त झालेले नाही. **थोडक्यात ज्यामुळे सर्व सामान्य जनतेचे खऱ्या अर्थाने आर्थिक उत्थान होते तेथेच, सत्तेचे केंद्रीकरण झालेले आहे.** आणि ज्यांना हे समजते ते सुध्दा ह्यावर **आवाज उठवायला तयार नाहीत**, त्यावर **लिखाण करायला तयार नाहीत**, त्यावर **आंदोलन करायला तयार नाहीत**, त्यावर **एकत्र यायला तयार नाहीत**, त्यावर **जन जागृती करायला तयार नाहीत**. एवढेच नव्हे तर विविध प्रकारच्या निवडणूकांमध्ये **संबंधितांच्या विरूध्द गुप्त मतदान देखील करायला तयार नाहीत**, हीच भारताच्या लोकशाहीची शोकांतिका आहे.

लोकशाहीची कुचंबना, शोकांतिका दुर करणेसाठी पार्श्वभूमी समजून घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्यात केवळ १५ ते २० व्यक्तिंनी मोठ्या प्रमाणात शिक्षण व्यवस्थेवर चारही बाजूंनी वेढा घालून, लोकशाहीच्या चौकटीत बसून त्यासाठी विविध कायदे व नियम बनवून कब्जा केलेला आहे. शैक्षणिक संस्था काढण्यासाठी मोक्याच्या जागेवर नगरपालिका, महानगरपालिका व शासनाकडून जागा नाममात्र भाडेपट्टीवर किंवा अत्यल्प किंमतीत पध्दतशीरपणे मिळविल्या आहेत. आणि त्या ठिकाणी वैद्यकीय, इंजिनिअरींग व अलिकडच्या युगातील संगणकावर संबंधित शाळा, कॉलेजेस् उभारली आहेत. अशा एक–एका संस्थेत ५० पासून ५०० कर्मचारी शिक्षक व शिक्षकेतर स्टाफ म्हणून नियुक्त केलेले आहेत. अशा शैक्षणिक संस्थांमध्ये विविध फॅकल्टीजमध्ये प्रवेश घेण्यासाठी एका विद्यार्थ्याकडून रूपये १ लाखापासून ४० लाखापर्यंत मध्यस्थांच्या मार्फत खुले आम देणग्या घेतल्या जात आहेत. अशा रीतीने शिक्षणातून संपत्ती व संपत्तीतून सत्ता व पुन्हा सत्तेतून संपत्ती असे चक्रव्युह भारतदेशाच्या लोकशाहीमध्ये राजरोसपणे चालू आहे.

राज्यात ठराविक प्रस्थापितांच्याच मोठ–मोठ्या शैक्षणिक संस्था, त्यांच्याच धर्मशाळा व आश्रम शाळा, त्यांचेच टोल नाक्यांचे ठेके, त्यांचेच हायवेच्या बाजूला मॉटेल्स, त्यांचेच पेट्रोल पंप, त्यांचीच सर्व ठिकाणी ठेकेदारी, त्यांचेच साखर कारखाने, त्यांच्याच सुत गिरण्या, त्यांचेच शासनास लागणाऱ्या नियमित वस्तूंचे कारखाने, त्यांचेच वृध्दाश्रम, ह्यावरून आपल्या एक लक्षात येईल की, समाजकारण – राजकारण व अर्थकारण

यामध्ये सत्ता जरासुध्दा झिरपली नाही. स्वतः, पती-पत्नी, आई - वडील, मुलगा- मुलगी, भाऊ - बहिण, पुतण्या - पुतणी, जावई , मेव्हणा - मेव्हणी ह्याशिवाय कुठेही सत्तेचे विकेंद्रीकरण झाले नाही. आणि ज्या ठिकाणी सत्तेचे विकेंद्रीकरण झाले नाही. त्या ठिकाणी सभोवतालच्या जनतेचे व सर्व सामान्यांचे आर्थिक उत्थान केव्हाच झाले नाही व होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. कारण असे जर असते तर **३०० चौ. फुटाच्या जागेत किराणा मालाचे दुकान चालविणारा दुकानदार श्रीमंत, परंतु तीन एकर जमीनीचे क्षेत्र धारण करणारा शेतकरी भिकारी राहिलाच नसता.** अशा दुकानदाराकडे गाडी, बंगला, जड जवाहर व बँकांमध्ये ठेवी तर शेतकरी कर्जाच्या खाइत व वेळ पडल्यास आत्महत्या करणाऱ्यांच्या यादीत त्याचा समावेश दिसलाच नसता. याहीपेक्षा महत्वाचे बोलायचे झाले तर ८० टक्के कृषिप्रधान असलेल्या भारतातील शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालाची किंमत त्याला ठरविण्याचा अधिकारच नाही. **त्याच्या मालाची किंमत दुसरा ठरवत असतो.** आणि विक्री किंमतीपेक्षा खर्च जास्त असला तरी कायदा किंवा लोकशाही त्याचे संरक्षण करीत नाही. याहीपुढे उदाहरणच द्यायचे असेल तर जे बुट किंवा पादत्राणे पायात घातले जातात, त्याची विक्री मात्र वातानुकुलीत जागेत होत असते. परंतु कांदा, बटाटा, पालेभाज्या कि जे अन्न म्हणून पोटात रोज जाते, ते मात्र उघड्या रस्त्यावर या देशात विकण्यासाठी कायद्यानेच व्यवस्था केलेली आहे. कायदा बदलणारे याबाबत विचार सुध्दा करू शकत नाहीत. **कारण सर्वसामान्य शेतकरी किंवा पिडलेला माणूस व सत्तेतून सतत दूर राहिलेला माणूस जर शिक्षणाने व आर्थिक संपन्न झाला तर तो निवडणूकीच्या काळामध्ये विकेंद्रीकरणाची भाषा बोलेल.** निवडणूकीच्यावेळी कार्यकर्ता तिकीट मागेल आणि जर निवडून आला तर आपल्याच जागेवर पुढचे वेळेस निवडणूकीस ऊभे राहण्यासाठी स्थान बळकट करील, याची भिती सत्तेचे केंद्रीकरण करणाऱ्यांना रोज वाटत असते.

राज्यात २८८ विधानसभेंचे मतदारसंघ व ४८ खासदारकीचे मतदारसंघ आहेत. आणि प्रत्येक राजकीय पक्षाने एका विधानसभा क्षेत्रात आपल्या किमान २०० कार्यकर्त्यांना प्रति महिना किमान ८-१० हजार रूपये उत्पन्न मिळेल असे काम किंवा धंदा उपलब्ध करून दिला तर अर्थकारणाचे व राजकारणाचे विकेंद्रीकरण व्हायला सुरूवात झाली, असे म्हणण्यास सुरूवात होईल. परंतु त्या २०० कार्यकर्त्यांमध्ये पती - पत्नी, मुलगा-मुलगी, मेहुणा-मेहुणी, जावई, पुतण्या-पुतणी, भाऊ-बहिण, आई-वडील असता कामा नये याची दक्षता घेणे आवश्यक आहे.परंतु कुठला राजकिय पक्ष व त्या पक्षाचे कार्यकर्ते याचा गंभीरपणे विचार करतील हाच खरा प्रश्न आहे. कर्तव्य व कर्म सिध्द करण्यास ह्या लोकशाहीने कोणालाच शिल्लक ठेवलेले नाही. लाचारांचा तांडा छाती पुढे करून स्वाभिमानाच्या खोट्या गोष्टी करतो व आव आणून आपल्या आई-वडील व पत्नी-मुलांना स्वप्ननगरीत भिजत ठेवत असतो.आणि निवडणूका आल्या की, तत्त्वाच्या गोष्टी करतो, फुशारकी मारतो व पाठीवर शाबासकी मिळवितो. व छोट्याशा मानासाठी व स्वार्थासाठी लोकशाहीला विकून टाकतो. **अशा वेळेस सत्ता आम्हांला का मिळत नाही ? त्यांनाच पुन्हा-पुन्हा कशी मिळते ? या साठी बंड पुकारत नाही.** कारण तो विकलांग झालेला असतो.नव्हे त्याला वेळोवेळी कैचीत पकडले जाते आणि याचाच गैरफायदा सत्तेचे केंद्रीकरणाचे राक्षस,कार्यकर्त्यांना व जनतेला रोज चिरडत असतात. दारू पिऊन दारुबंदीचे भाषण करीत असतात. चार ते पाच मुलांचा बाप लोकसंख्येवर व कुटुंब नियोजनावर भाषण करतो. एक रुपयाची वस्तु तीन रुपयांत टेंडरद्वारे खरेदी करणारा किंवा विकणारा लोकशाहीच्या केंद्रीकरणाचा बकासूर व पापी भ्रष्टाचाराबद्दल

भाषणे करतो. आणि हे जनतेला मोठ्या प्रमाणात माहितच नसते, व ज्यांना थोड्याफार प्रमाणात माहित असते, ते भविष्यात आपला काही फायदा होईल ह्या स्वार्थी भावनेने केंद्रीकरणाचीच री ओढतात, हे कटू सत्य आहे.

साखर कारखान्यांना - साखर सम्राटांना हजारो कोटी रुपयांचे पॅकेज दिले जाते, की ज्या पॅकेजचा फायदा ऊस उत्पादक शेतकऱ्यांना केंव्हाच मिळत नाही, परंतु पतसंस्थांसारखी ग्रामीण व शहरी भागातील शेतकरी, पगारदार तसेच छोटा-मोठा धंदा करणाऱ्या कार्यकर्त्यांची ही चळवळ कुठल्याही पॅकेजने ताकदवान केली नाही. झालेली थकबाकी वसूल करण्यासाठी कोर्टाकडून मिळविलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी '' **विशेष वसूली अधिकाऱ्यांची संख्या** '' सुध्दा अत्यंत महागडी व दुर्मीळ करुन पतसंस्था कशा तोट्यात जातील, यावर पध्दतीशीरपणे आखणी झालेली आहे. **कारण छोट्या लोकांनी उभ्या केलेल्या पतसंस्था जर आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्या तर ते सत्तेच्या केंद्रीकरणाच्या बादशहांना सर्व स्तरावरील निवडणुकांमध्ये उताणे पाडतील** हे त्यांना माहित आहे. यासाठी सहकार कायदा व नियम सोयीचा बनविलेला आहे. त्यात बदल करण्याचे जरी सुचविले तरी झोपचे सोंग घेतलेले जागेच होत नाहीत.

अलीकडचेच उदाहण द्यायचे असेल तर काही लाखात खेळते भांडवल असणाऱ्या संस्थांचे लेखापरिक्षण शासकिय लेखापरिक्षकांमार्फत केले जाते. परंतु करोडो रूपयांचे खेळते भांडवल असणाऱ्या सहकारी संस्थांचे लेखापरिक्षण मात्र खाजगी ऑडीटरकडून करण्याचे राज्यात धोरण स्विकारलेले आहे. आणि अशा संस्थांचे लेखापरिक्षण करण्यासाठी खाजगी ऑडीटरकडून ४० टक्के कमिशन घेऊन खुले आम दलालांच्यामार्फत बेकायदेशीरपणे संस्थांचा लिलाव केला जातो, हे कोणाला माहित नाही ? मंत्र्यांना माहित नाही ? सहकार आयुक्तांना माहित नाही ? संस्था कार्यकर्त्यांना माहित नाही ? हे सर्वांना माहित असताना देखील मुडद्यासारखे सर्व निमुटपणे सहन करीत आहेत. सत्तेचे विकेंद्रीकरण ह्याचसाठी होणे आवश्यक आहे. आमदार किंवा खासदार किंवा मंत्री तेच, महामंडळाचा अध्यक्ष तेच, जिल्हा बँकेवर तेच, राज्य सहकारी बँकेवर तेच, पेट्रोलपंप, मॉटेलस् , वाईन शॉपस्,शुभ मंगल कार्यालय, टोल नाके, मोठ-मोठ्या एजन्सीज,कॉलेजेस त्यांचीच आणि हे सर्वस्तरावर कमी-जास्त प्रमाणात असेच आहे.

राज्यामध्ये ३१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व १ राज्य सहकारी बँक आहे. एक - दोन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका जर सोडल्या तर इतर सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमध्ये त्या भागातील आमदार, खासदार व मंत्री स्वत: संचालक आहेत. आणि राज्य बँकेतही असेच आहे. आणि मंत्री किंवा खासदार किंवा आमदार नसलेला कुठला कार्यकर्ता राज्य बँकेत स्वत:चे मत ऊघडपणे मांडेल ? याचे उत्तर नाही असे आहे. आणि मग जर कायद्यानुसार संचालक मंडळ असेल तर वरील अशा पध्दतीमुळे निर्णय घेणारे हेच निर्णयाची अंमलबजावणी करणारे सत्तेच्या केंद्रीकरणाचे सर्वेसर्वा साळसूदपणे मोठ-मोठ्या तात्विकतेच्या गप्पा मारीत असतात आणि बाकी सर्व लाचार व कमकुवत बनून खोट्या मानापमानासाठी वावरत असतात. आणि हे आता लोकशाहीमध्ये थांबविण्यासाठी कृतीने सुरूवात करावयास हवी.

लोकशाहीत सत्तेच्या केंद्रीकरणाच्या मालकांनी ''**श्री सिध्दीविनायकाला**'' सुध्दा सोडलेले नाही. प्रभादेवी, मुंबई येथील सिध्दीविनायक ट्रस्ट यामधून करोडो रूपयांच्या देणग्या यांच्याच संस्थांनी मिळविल्या आणि त्याची दखल मा. उच्च न्यायालय, मुंबई यांना घ्यावी लागली. केंद्र सरकार व राज्य सरकार व परदेशाकडून सुध्दा मदत यांच्याच संस्थांना कशी मिळते ? सर्वसामान्य कार्यकर्त्यांनी उभ्या केलेल्या शाळा,

कॉलेजेस, सहकारी संस्थांना का मिळत नाही ? याचा विचार केल्याशिवाय विकेंद्रीकरणास सुरूवात होणार नाही. विविध न्यायालयांनी यांचेवर ताशेरे ओढूनही यांच्यात काहीही फरक पडलेला नाही. जोपर्यंत अशा महाभागांवर आयपीसी खाली गुन्हा दाखल होत नाही, व वर्षानुवर्षे जेलमध्ये डांबले जात नाहीत व यांना समाज पुर्ण बहिष्कृत करीत नाही, यांची संपत्ती – पैसा आणि स्थावर जंगम मालमत्तेचा जाहिर लिलाव होत नाही, तोपर्यंत सत्तेचे विकेंद्रीकरण होणे नाही.

एकंदरीत लोकशाहीतील सत्तेचे विकेंद्रीकरण व सहकार ह्याकडे अत्यंत सुक्ष्म पध्दतीने बघितले पाहिजे. **ठराविक प्रस्थापितांच्या हातातील प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकारातील सत्ता व हस्तक्षेप दूर करण्यासाठी दूरगामी वैचारीक मंथन होण्याची गरज आहे.** आणि हा विचार लोकप्रतनिधींनी स्वत:हून जनतेमध्ये कृतीने सिध्द केला पाहिजे. आणि हे जर होणार नसेल तर कायद्याची मदत घेण्याची आवश्यकता आहे. सहकार कायद्यात बदल करावयास पाहिजे. परंतू कायदा बनविणारेच ह्या बाबतीत उदासिन असतील तर लोकशाहीचे चळवळीचे हत्यार विविध निवडणूकांमध्ये उपसले पाहिजे. व **कायदा बनविणाऱ्यांच्या सभागृहामध्ये वरील विचाराचे कुठल्याही राजकीय पक्षांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने विधीमंडळात जावून बसले पाहिजेत.**

म्हणून लोकशाहीतील सहकाराच्या विकेंद्रीकरणाचा वेगळा व अत्यंत महत्वाचा मुद्दा आम्ही संपूर्ण राज्यात विचारार्थ ठेवत आहोत. तो खालीलप्रमाणे ..........

**सहकार कायद्यात कोणत्या व्यक्तिस सहकारी संस्थेचे सभासद होता येईल ? याची तरतूद आहे. तशी संचालक होण्यासाठी पध्दत – रित व पात्रता – निकष आहे. कुठल्याही प्रकारच्या सहकारी संस्थेवर संचालक म्हणून निवडून येण्यासाठी संचालकाची पात्रता तसेच नामनिर्देशीत व स्विकृत संचालकाची पात्रता ह्यातच त्वरीत कायद्यात सुधारणा करणे तातडीचे व अत्यावश्यक आहे. ती खालीलप्रमाणे .............**

**‘‘ कुठल्याही प्रकारच्या सहकारी संस्थेवर निवडणूकीद्वारे – नामनिर्देशीत – स्विकृत किंवा सल्लागार म्हणून संचालक होणारी व असणारी व्यक्ती आमदार किंवा खासदार किंवा मंत्री असता कामा नये.''**

हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा सहकारी संस्थांच्या विकेंद्रीकरणासाठी आम्ही मांडलेला आहे. आणि जर अशी सुधारणा झाली तर, संपुर्ण राज्यात सहकारी संस्थांमध्ये सत्तेचे विकेंद्रीकरण होऊन निर्भिडपणे खऱ्या कार्यकर्त्यांना जिल्हा बँका, राज्य बँक, साखर कारखाने, सुत गिरण्या, नागरी बँका व पतसंस्था स्वतंत्रपणे चालविता येतील. आणि ज्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीमुळे किंवा अनुपस्थितीमुळे सुध्दा कालपर्यंत दबाव येत होता, तो अचानक गायब होईल. **आणि सर्वसामान्य कार्यकर्त्यांना पतसंस्था, बँका, साखर कारखाने, सुत गिरण्या सक्षमपणे चालविता येतील. आणि राज्यावर झालेला कर्जाचा डोंगर देखील काही पळवाटा न काढता दूर करता येईल.** आणि त्याचे फायदे सर्वसामान्य सहकारी कार्यकर्त्याला, शेती – धंदा व समाज व्यवस्थेमध्ये सर्वांना होऊन मोठ्या प्रमाणात सर्वसामान्यांचे आर्थिक जिवनमान उंचावेल. व ज्यांना सत्ता व पैश्याच्या जिवावर आजपर्यंत घेरले, दाबले, घाबरविले, ते सर्व स्वतंत्र होतील व महाराष्ट्र राज्यात चमत्कार झाल्याशिवाय राहणार नाही.

लोकशाही व सत्तेचे विकेंद्रीकरण हा एक छोटा विचार आपल्या लेखी अभिप्रायासाठी आम्हांला आपल्यासमोर मांडताना आनंद होत आहे. जे कोण केंव्हाही बोलले नाही, ते आम्ही आज खुल्या आवाजात व पुरावा ठेऊन या अग्रलेखाद्वारे बोलत आहोत. आपले अभिप्राय लेखी स्वरूपात आंम्हाला पाठवावेत, असे आपणांस आवाहन करण्यात येत आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**